**<u>ठळक बातम्या</u>**

- महावीर जयंतीनिमित्त सर्वत्र धार्मिक कार्यक्रम आणि शोभायात्रांचं आयोजन
- नक्षलवादाविरोधातल्या लढ्यात महाराष्ट्र पोलिसांनी निर्णायक यश मिळवलं असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
- १५व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार पंचायती राज आणि स्थानिक स्वराज्य संस्थांकरता राज्याला दुसऱ्या टप्प्यात १०९ कोटी रुपये वितरित
- मुंबई महानगरपालिका आयुक्त पदासाठी मेट्रोवुमन अश्विनी भिडे यांचं नाव निश्चित

**आणि**

- राज्याच्या विविध भागात अवकाळी पाऊस आणि गारपीटीनं शेतीचं नुकसान

**<><><><><>**

जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांची जयंती आज सर्वत्र उत्साहात साजरी होत आहे. गावागावात आज जैन मंदिरांमधे धार्मिक प्रवचन आणि इतर कार्यक्रम होत आहेत. तसंच शोभायात्रांचं आयोजन करण्यात आलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महावीर जयंती निमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, लोकसभेचे सभापती ओम बिरला यांनी ही महावीर जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

भगवान महावीरांची शिकवण मानवतेला शांती, सलोखा आणि करुणेच्या दिशेने मार्गदर्शन करत असल्याचं राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी दिलेल्या संदेशात म्हटलं आहे.

भगवान महावीर यांचा सत्य, अहिंसा आणि जागतिक शांततेचा संदेश मानवतेला मार्गदर्शक आहे असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात महावीर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

सत्य आणि अहिंसेचा मार्ग दाखवत जगाला प्रेमाची शिकवण देणाऱ्या भगवान महावीर यांना जयंतीनिमित्त कोटी कोटी वंदन करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जैन बांधवांना हार्दीक शुभेच्छा असं आपल्या संदेशात म्हटलं आहे. मुंबईत दादर इथं भारत जैन महामंडळातर्फे आयोजित महावीर जन्मकल्याणक महोत्सवात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सहभागी झाले होते.

**<><><><><>**

गांधीनगर इथल्या सम्राट संप्रति संग्रहालयाचं उद्घाटन महावीर जयंती निमित्त आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं. देशाच्या उज्ज्वल परंपरा आणि इतिहासाचं ज्ञान भविष्यातल्या आव्हानांना सामोरं जाण्यासाठी बळ देतं असं त्यांनी यावेळी सांगितल. अहमदाबाद जिल्ह्यात साणंद इथं केन्स सेमीकॉन प्रकल्पाचं उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं.

**<><><><><>**

चोवीसावे जैव तीर्थंकर भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त **सांगली**त लेझीम, झांजपथकांसह शोभायात्रा काढण्यात आली. या निमित्ताने भरवलेल्या रक्तदान शिबिरात दोनशेहून अधिक जणांनी रक्तदान केलं.

**धुळे** जिल्ह्यात सकल जैन समाजाच्या वतीने मिरवणूक काढण्यात आली. भगवान महावीर यांचा संदेश फक्त जैन अनुयायांसाठी नाही तर संपूर्ण मानवजातीसाठी महत्वाचा असल्याचे विचार यावेळी उपस्थित असलेल्या संत मुनी यांनी व्यक्त केले.

**हिंगोली**तही जैन समाजाने भव्य मिरवणूक काढून महावीर जयंती साजरी केली. महावीर जयंतीच्या सुट्टीमुळे देशांतर्गत शेअर बाजार आज बंद आहे तर वस्तू बाजार सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत बंद राहणार आहेत.

**<><><><><>**

नक्षलवादाविरोधातल्या लढ्यात महाराष्ट्र पोलिसांनी निर्णायक यश मिळवलं आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मुंबईत पोलीस महासंचालक कार्यालयात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची अर्धवार्षिक परिषद काल झाली,त्यावेळी ते बोलत होते. माओवादी कारवाया आता राज्यात नगण्य पातळीवर आल्या असल्याचं त्यांनी सांगितलं. यामुळे, किमान तीन वर्षे सी-60 मध्ये सेवा बजावणाऱ्या जवानांना राज्य शासन विशेष 'सी-60 पदक' देणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. पोलीस तपासामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा म्हणजे AI चा वापर वाढवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. वरिष्ठ नक्षली नेता सी नारायण राव याच्यासह ९ नक्षलींनी काल आंध्रप्रदेश पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलं.

**<><><><><>**

नक्षली कारवायांनी प्रभावित भागांमधे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकास पोहोचत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. देश नक्षलमुक्त करण्यासाठीच्या प्रयत्नांबाबत लोकसभेत झालेल्या चर्चेला काल त्यांनी उत्तर दिलं.

नक्षलग्रस्त १२ राज्यांमध्ये अतिरेकी कारवायांमधे २० हजार जण मरण पावले, तर सुमारे १२ कोटी लोक अनेक वर्षे विकासापासून वंचित राहिले, असं शहा म्हणाले. नक्षलवाद नष्ट करून या भागात विकास पोहोचवण्यासाठी गेल्या १२ वर्षात केलेल्या विविध उपाययोजनांची त्यांनी माहिती दिली.

**<><><><><>**

जनगणनेची प्रक्रिया उद्यापासून सुरू  होणार असून, नागरिकांना स्व-नोंदणी पोर्टलद्वारे दोन्ही टप्प्यांत माहिती देण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. देशातली ही १६वी जनगणना असून पहिल्या टप्प्यात प्रत्येक घराची माहिती गोळा केली जाईल. त्यात घराचा क्रमांक, मजला, घराची स्थिती आणि घरात राहणाऱ्या व्यक्तींची संख्या अशा माहितीचा समावेश असेल. या प्रक्रियेत कुटुंबप्रमुखाचे नाव, लिंग, जात, मालकी हक्क, तसंच घरातील विवाहित जोडप्यांची संख्या आणि वाहनांची माहितीही नोंदवली जाणार आहे. जर एखादं जोडपं लिव्ह-इन संबंधाला कायमस्वरूपी आणि विश्वासार्ह नातं मानत असेल, तर त्यांची गणना विवाहित जोडप्यामध्ये केली जाईल असं या पोर्टलमध्ये म्हटलं आहे. पोर्टलवर वारंवार विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची यादी उपलब्ध आहे, त्यामुळे जनतेला विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरं देणं सोपं जाईल.

**<><><><><>**

पंचायती राज संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी १५व्या वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार अनुदानाला मंजुरी देऊन केंद्र सरकारनं निधी वितरित केला आहे. महाराष्ट्राला २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यामधून प्रत्येकी १०९ कोटी रुपये वितरित झाले आहेत.  या अनुदानामुळे गावपातळीवर प्रशासन अधिक सक्षम होईल आणि गरजेनुसार विकासकामं राबवता

येतील. ठरावीक उद्दिष्टांसाठी मर्यादित निधी आणि स्थानिक गरजेनुसार वापरता येणारा निधी असे दोन प्रकारचा हा निधी आहे.

<><><><><>

मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तपदी सध्या मुख्यमंत्री कार्यालयात अतिरिक्त मुख्य सचिव असलेल्या अश्विनी भिडे यांचं नाव निश्चित झालं आहे. १९९५ च्या तुकडीतल्या आयएएस अधिकारी अश्विनी भिडे यांनी मुंबईत मेट्रो ३ म्हणजेच ॲक्वा लाईन सुरु करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. आयुक्त भूषण गगरानी आज निवृत्त होणार असून त्यांच्या जागी भिडे आयुक्तपदाचा पदभार स्वीकारतील.

<><><><><>

शिवसेना पक्षाने राज्यातल्या ४८ लोकसभा मतदारसंघांच्या संपर्क प्रमुखांची नावं जाहीर केली आहेत. मुंबईतले सहा मतदारसंघ आणि ठाणे मतदारसंघाच्या संपर्कप्रमुख पदाची जबाबदारी खासदार श्रीकांत शिंदे यांच्याकडे देण्यात आली आहे. भिवंडी आणि कल्याणसाठी नरेश म्हस्के यांच्याकडे संपर्क प्रमुखपद देण्यात आलं आहे.

<><><><><>

IPL क्रिकेटमध्ये, पंजाब किंग्ज विरुद्ध गुजरात टायटन्स हा सामना आज चंडीगडमधे होणार आहे. काल गुवाहाटीच्या बरसापारा क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सनं चेन्नई सुपर किंग्सचा आठ गडी राखून पराभव केला.

<><><><><>

राज्यात काल रात्रीपासून विविध जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसाने हजेरी लावली.

जालना जिल्ह्यामध्ये अवकाळी पावसामुळे अंबड तालुक्यातल्या महाकाळा इथं दोन तरूणांचा वीज कोसळून मृत्यू झाला. तर पावसामुळे काढणीस आलेला गहू, हरभरा, मका या पिकांचे नुकसान झाले असून जोरदार वाऱ्यामुळे आंबा पिकालाही फटका बसला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून राहाता अणि पाथर्डी तालुक्यामध्ये वीज पडून दोन शेतकर्‍यांचा मृत्यू झाला.

परभणी जिल्ह्यामध्ये वादळी वाऱ्यामुळं अनेक घरांवरील पत्रे उडाले असून वीज पुरवठा खंडित झाला होता.

जळगाव जिल्ह्यामध्ये काल संध्याकाळी झालेल्या वादळी पावसामुळं रब्बी पिकांचे मोठे नुकसान झाले. नाशिक जिल्ह्यामध्ये पाऊस आणि गारपिटीमुळं द्राक्ष, डाळिंब बागे सह कांदा पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

हिंगोली जिल्ह्यामध्ये अवकाळी पावसामुळं गहू, हळद पिकांचे मोठे नुकसान झाले असून अनेक भागात वीज पुरवठा खंडीत झाला .

अकोला जिल्ह्यामध्ये विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह काही भागांमध्ये गारपीट नोंदवली गेली. अकोट तालुक्यातल्या कावसा इथं शेतात वीज कोसळून आठ मेंढ्या दगावल्या. तालुक्यात या पावसामुळे गहू, कांदा, लिंबू, आंबा, पपई, आदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी कापणीसाठी ठेवलेले धान्य भिजून खराब झाले, तर फळबागांमध्ये पडझड झाली.

यवतमाळ जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांच्या रब्बी, भाजीपाला आणि फळपिकांचे मोठे नुकसान झालं आहे..

**<><><><><>**

ठाणे, कोकण, मराठवाडा आणि विदर्भातल्या बहुतांश जिल्ह्यांना आज हवामान विभागाने विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. तर सांगली, सोलापूर, परभणी, हिंगोली आणि नांदेड या जिल्ह्यांना वादळी पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. नाशिक, नाशिक घाट परिसर, अहिल्यानगर, पुणे, पुणे घाटमाथा, सातारा, लातूर, धाराशिव आणि यवतमाळ या भागांना उद्यासाठी वादळी पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

**//<><><><><>//**